# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ६ सप्टेंबर २०१७.

## नांदेड- वाघाळा महानगरपालिकेसाठी ११ ऑक्टोबरला मतदान

### बृहन्मुंबई, नागपूर, कोल्हापूर व पुण्यातील ५ रिक्तपदांसाठीदेखील मतदान

मुंबई, दि. ६: नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक; तसेच बृहन्मुंबई, पुणे व नागपूर महानगरपालिकेच्या प्रत्येकी एका आणि कोल्हापूर महानगरपालिकेच्या दोन रिक्तपदांच्या पोट निवडणुकांसाठी ११ ऑक्टोबर २०१७ रोजी मतदान होणार आहे. मतमोजणी १२ ऑक्टोबर २०१७ रोजी होईल. त्यासाठी आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे केली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, नांदेड- वाघाळा महानगरपालिकेची मुदत ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी संपत आहे. शहराची एकूण लोकसंख्या ५ लाख ५० हजार ४३९ असून मतदारांची संख्या सुमारे ३ लाख ९६ हजार ५८० इतकी आहे. एकूण २० प्रभागांतील ८१ जागांसाठी मतदान होईल. त्यापैकी महिलांसाठी ४१ जागा राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १५, अनुसूचित जमातींसाठी २; तर नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २२ जागा राखीव आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रभाग क्र. '११६', पुण्यातील प्रभाग क्र. '२१अ' नागपूरमधील प्रभाग क्र. '३५-अ' आणि कोल्हापूरमधील प्रभाग क्र. '११' व '७७' च्या रिक्तपदांच्या पोट निवडणुकांसाठीदेखील मतदान होत आहे. या सर्व ठिकाणी १६ सप्टेंबर २०१७ पासून नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यास सुरूवात होईल. ११ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. नांदेड- वाघाळा महानगरपालिका आणि पोट निवडणूक होत असलेल्या अन्य महानगरपालिकांच्या संबंधित प्रभागांत आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर ती संपुष्टात येईल. मतमोजणी १२ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल, असेही श्री. सहारिया यांनी सांगितले.

**निवडणूक कार्यक्रम**

- **नामनिर्देशनपत्रे दाखल करणे-** १६ ते २३ सप्टेंबर २०१७
- **नामनिर्देशपत्रांची छाननी-** २५ सप्टेंबर २०१७
- **उमेदवारी मागे घेणे-** २७ सप्टेंबर २०१७
- **निवडणूक चिन्ह वाटप-** २८ सप्टेंबर २०१७
- **मतदान-** ११ ऑक्टोबर २०१७
- **मतमोजणी-** १२ ऑक्टोबर २०१७
- **निकालांची राजपत्रात प्रसिद्धी-** १३ आक्टोबर २०१७

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)